# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पनवेल (जि.रायगड) येथे आदिवासी विद्यार्थ्यांना राहण्याची सोय नसल्याबाबत

**(१) ८१८६ (१०-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) हे परिसर शैक्षणिक हब झाल्याने या ठिकाणी डीएड, बीएड, नर्सिंग, वैद्यकीय, विधी, औद्योगिक यासारख्या शैक्षणिक संस्था असून, आदिवासी विद्यार्थ्यांना आरक्षण असल्याने या ठिकाणी त्यांना प्रवेश मिळतो मात्र सदरहू विद्यार्थ्यांना तेथे राहण्याची सोय नसल्याने त्याची गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाने सुकापूर येथे शासकीय वसतीगृह सुरु केले असूनही विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि अपुरी जागा यामुळे अनेक विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) वसतिगृहाच्या मंजूर क्षमतेपेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशीत असल्याने अर्ज केलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत असल्याने त्यांची गैरसोय झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वृध्दांसाठी कोणताही खर्च न करता वृध्दाश्रम त्यांची फसवणूक करुन निधीचा दुरुपयोग करीत असल्याबाबत

**(२) १४१३५ (१०-०४-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने किती संस्थांना कोणत्या निकषाद्वारे वृध्दाश्रम चालविण्याची परवानगी दिली आहे,
(२) असल्यास, वृध्दाश्रमातील वृध्दांसाठीच्या योजना काय आहेत, तसेच वृध्दाश्रमात दाखल होण्याची प्रक्रिया काय आहे व वृध्दाश्रमामधील प्रत्येक वृध्दांमागे शासन किती खर्च करीत आहे,
(३) असल्यास, काही वृध्दाश्रम वृध्दांसाठी कोणताही खर्च न करता शासनाची फसवणूक करुन निधीचा दुरुपयोग केला जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये "मिशन जस्टीज" या सामाजिक कार्यकर्त्यांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने संबंधित संस्था चालकांवर कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०२-०१-२०१८) :** (१) शासन निर्णय क्र. २०/०६/१९६३ च्या निकषानुसार सर्वसाधारण वृध्दाश्रम शासन निर्णय दि. १७/११/१९९५ च्या निकषानुसार मातोश्री वृध्दाश्रम चालविण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्यात ३९ सर्वसाधारण वृध्दाश्रम व ३१ मातोश्री वृध्दाश्रमाला शासनाने मान्यता दिलेली आहे.
(२) सामाजिक न्याय विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांकरिता सर्वसाधारण वृध्दाश्रम, मातोश्री वृध्दाश्रम, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देणे, ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. भाड्यात ५०% सवलत, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना या योजना राबविण्यात येतात. या वृध्दाश्रमामध्ये ६० वर्षावरील पुरुष व ५५ वर्षावरील स्त्रियांना मोफत प्रवेश दिला जातो. या वृध्दाश्रमामध्ये प्रवेशितांना निवास, अंथरुण-पांघरुण, भोजन, वैद्यकीय व्यवस्था इत्यादि सोयीसुविधा मोफत पुरविण्यात येतात. प्रत्येक वृध्दासाठी प्रतिमाह रु. ९००/- प्रमाणे १२ महिन्यांसाठी शासनाकडून परिपोषण अनुदान देण्यात येते.
(३) अंशतः खरे आहे.
(४) सामाजिक न्याय विभागाअंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांना आवश्यक तो सर्वे करुन वृध्दाश्रमासाठी तपासणी करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये एखादी स्वयंसेवी संस्था दोषी आढळल्यास किंवा कायद्यातील मानकानुसार वृध्दाश्रम चालविण्यात येत नसल्यास अशा स्वयंसेवी संस्थांच्या विरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वसतिगृहांतील आदिवासी विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा मिळण्याबाबत

**(३) १६६०५ (३१-०७-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४६६ शासकीय वसतीगृहांतील आदिवासी विद्यार्थ्यांना दिनांक ११ जानेवारी, २०११ च्या शासन निर्णयानुसार सर्व आवश्यक सुविधा दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत द्याव्यात तसेच अनुदानाची थकबाकी ४ महिन्यात देण्याचे निर्देश मा.मुंबई उच्च न्यायालयाने शासनाला माहे फेब्रुवारी, २०१५ दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने न्यायालयीन निर्देशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) विभागाच्या शासन निर्णय क्र. आवगृ-२०११/प्र.क.१७१/का-१२, दि.११.११.२०११ प्रमाणे देय सोयी सुविधा उपलब्ध अनुदानातून प्रकल्प अधिकारी व गृहपाल यांनी दि. ३१.०३.२०१५ पर्यंत विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क योजने अंतर्गत अर्ज महाविद्यालयांकडे प्रलंबित असल्याबाबत

**(४) २०१४० (३१-०७-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती तसेच शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क योजनेअंतर्गत जवळपास ७५ हजार अर्ज विहित कालावधीत प्राप्त होवूनही महाविद्यालयीन स्तरावर प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदतीत सादर केलेल्या अर्जानुसार मान्यता न देणाऱ्या महाविद्यालयीन अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०१-२०१८) :** (१) व (२) शिष्यवृत्ती मंजूर करतांना वेबसाईटला महाविद्यालयांचे मॅपिंग झालेले नसणे इ. तांत्रिक अडचणींमुळे काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करता आले नाही. तथापी आता ई- विकास प्रणाली मार्फत उर्वरीत सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषीपंपाना वीज पुरवठा करण्याचे काम माहे मार्च, २०१६ पर्यंत करण्याचा निर्णय शासनातर्फे घेण्यात आल्याबाबत**

**(५) २८२११ (२६-१०-२०१५). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती पंपाच्या नवीन वीज जोडणीसाठी पैसे भरुन प्रलंबीत असणाऱ्या शेतकऱ्यासाठी कृषीपंपाना वीज पुरवठा करण्याचे काम माहे मार्च, २०१६ पर्यंत करण्याचा निर्णय शासनातर्फे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासनाने या निर्णयानुसार शेतकऱ्यांचे कृषी पंपना विज पुरवठा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) व (२) राज्यात मार्च, २०१५ अखेर १,७३,८५२ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते. सन २०१५-१६ मध्ये विविध योजनांतर्गत मार्च, २०१६ अखेर १,३०,००० कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले.

तसेच सन २०१६-१७ मध्ये सदर योजनाअंतर्गत १,२५,५२२ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून सन २०१७-१८ मध्ये सप्टेंबर, २०१७ अखेर ३६,४५६ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डिंगडोह (दबी) (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे दलित वस्तीच्या विकासासाठी निधी मिळण्याबाबत**

**(६) ३०९६९ (२२-०१-२०१६). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डिंगडोह (दबी) (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे दलित वस्तीच्या विकासासाठी शासनकडून मिळालेला निधी दुसऱ्याच ठिकाणी व दुसऱ्याच कामावर खर्च केला जात असल्यामुळे येथील दलित वस्तीतील विकास कामांची व आलेल्या निधीची चौकशी करण्याची मागणी दलितवर्गाकडून केली जात असल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, उपरोक्त विकास कामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही, मात्र ग्रामपंचायत डिंगडोह (देवी) येथील मंजूर विकासकामांसाठी मंजूर झालेला निधी त्याच विकासकामांवर खर्च करण्यात आलेला आहे.
(२) ते (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुखेड (ता.जि.नांदेड) येथील १०० खाटांच्या रुग्णालयातील वीजपुरवठा २४ तास सुरळीत राहण्याबाबत**

**(७) ३३९७४ (२३-१२-२०१५). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (ता.जि.नांदेड) येथील १०० खाटांच्या रुग्णालयातील वीजपुरवठा २४ तास सुरळीत रहावा याकरिता सन २००९ मध्ये साडेसतरा लाख रुपये भरणा करुनही विज वितरण कंपनीने एक्सप्रेस फिडर बसविले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी होत असलेला विलंब लक्षात घेता मागील अनेक वर्षापासून स्थानिक लोकप्रतिनिधी पाठपुरावा करीत असताना सन २०१४ मध्ये वा त्या सुमारास वीज वितरण कंपनीने या जोडणीकरिता वाढीव रक्कमेची मागणी केली व संबंधित आरोग्य विभागाने कोणतीही विचारणा न करता ती पीएलए फंडातील साडेआठ लाख रुपये विज वितरण कंपनीकडे भरले असतानाही अद्यापही विज वितरण कंपनीने एक्सप्रेस फिडर बसविला नसल्याने रुग्ण तसेच त्याच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक ती कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) व (२) सदर रुग्णालयास दिनांक २६.०८.२०१५ रोजी स्वतंत्र वाहिनीवरुन (मुखेड एक्सप्रेस फिडर) विद्युत पुरवठा जोडून देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यभरात घरगुती ग्राहकांसाठी ० ते ३०० युनिट वर्गात सर्व वीज कंपन्यांनी समान वीज दर आकारण्याबाबत**

**(८) ३४९९५ (२३-१२-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात घरगुती ग्राहकांसाठी ० ते ३०० युनिट वर्गात सर्व वीज कंपन्यांनी समान वीज दर आकारण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक मंडळाकडे (एमईआरसी) संमतीसाठी सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास वीज नियामक मंडळाने मंजूरी दिली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपययोजना केल्या आहेत,

(४) उपरोक्त प्रस्तावास वीज नियामक मंडळाने मंजूरी दिली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यात वेगवेगळया वर्गवारीतील वीज ग्राहकांचे वीजदर ठरविण्याचे अधिकार विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास आहेत. सदरचे वीज दर निश्चित करतांना वीज वितरण कंपन्याचा वीज पुरवठयासाठी होणाऱ्या प्रत्येक अनुज्ञेय बाबींवरील खर्च, ग्राहकांची संख्या तसेच वर्गवारी इत्यादी घटक आयोगाकडून विचारात घेतले जातात.

---

**सोलापुर शहरासाठी महावितरण कंपनीचे झोनल कार्यालय उभारण्याबाबत**

**(९) ३५२५४ (२२-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पहिल्या दहा स्मार्ट सिटीमध्ये सामाविष्ठ होणा-या सोलापुरसाठी महावितरण कंपनीचे झोनल कार्यालय उभारणेची मागणी मा.मुख्यमंत्री, मा.उर्जामंत्री आदींना स्थानिक लोकप्रतिनिधीनी व नागरिकांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरण कंपनीने निश्चित केलेल्या मानकांतील तरतुदीनुसार नवीन परिमंडळ कार्यालय निमिर्तीसाठी एकूण २४ लाख ग्राहक संख्या असणे आवश्यक आहे. विहित मानकानुसार ग्राहकांची संख्या कमी असल्याने सोलापूर शहरात महावितरण कंपनीचे नवीन परिमंडळ (झोन)

कार्यालय निर्माण करणे सद्यस्थितीत शक्य नाही. परंतु सोलापूर शहरामधील ग्राहकांची दैनंदिन स्वरुपाची सर्व कामे होण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार सोलापूर मंडळ कार्यालयास देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर व गडचिरोली येथील आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये अनेक समस्या असल्याबाबत**

**(१०) ३६६५३ (२२-१२-२०१५). ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर व गडचिरोली येथील आश्रमशाळा व वसतीगृहांमध्ये अनेक समस्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वसतीगृहांतील रोहीत्रयंत्र (जनरेटर डी.जे.सेट), संगणक कक्ष, ग्रंथालय/ वाचनालय बंद स्थितीत असून मुलभूत सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुन ही दखल घेण्यास दिरंगाई होत असल्याच्या अनेक तक्रारी विद्यार्थ्यांकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०१-२०१८) :** (१) व (२) अंशतः खरे आहे.

वसतिगृहातील रोहीत्रयंत्र (जनरेटर डी.जे.सेट) ची बॅटरी निकामी झाल्यामुळे बंद आहे. ग्रंथालय सूरू असून विद्यार्थ्यांच्या मागणीनूसार रात्रीला सुध्दा ग्रंथालय सुरू ठेवण्यात येत आहे. संगणक कक्ष चालू स्थितीमध्ये आहे.

(३) व (४) वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त समस्यांबाबत गृहपालांकडून तातडीने निपटारा करून योग्य ती कार्यवाही करण्यात येते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बासंबा (ता.जि.हिंगोली) येथील ३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम अपूर्ण स्थितीत असल्याबाबत**

**(११) ४१३२८ (२०-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बासंबा (ता.जि.हिंगोली) ३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम गेल्या अनेक दिवसापासून अपुर्ण स्थितीत असल्याने उक्त उपकेंद्राचे काम त्वरीत पुर्ण करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाव्दारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकेंद्राचे असलेले अपुर्ण काम पुर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे,
(३) अद्याप, याबाबत कार्यवाही करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
बासंबा येथील ३३ के.व्ही. उपकेंद्राचे काम पुर्ण झाले असुन दि. २९.०४.२०१६ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील आदिवासी मुलांच्या वसतीगृहात विविध सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१२) ४१३३६ (२९-०४-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी)** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हयातील आदिवासी मुलांच्या वसतीगृहात विविध सुविधांचा अभाव असून शैक्षणिक वर्ष अर्ध्यापेक्षा जास्त संपूनही साहित्य मिळाले नसल्याची तक्रार भारतीय आदिवासी पँथरने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रकल्प अधिकारी, कळमनूरी यांच्या कडून चौकशी करण्यात आली असता तक्रारी मध्ये नमूद बाबी तपासणीच्या वेळी आढळल्या नसून विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) धनगर वाड्यांवर वीज पुरवठा करण्याबाबत**

**(१३) ४५३८१ (२०-०४-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) धनगर वाडयावर अद्याप वीज पुरवठा झाला नसल्याने तेथील नागरीकांना विद्युत पुरवठा करण्याची मागणी मा.उर्जा मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी चंदगड यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने विदयुत पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीने चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) बांद्राई, नगरगांव व कोदाळी येथील चार धनगरवाड्यांना विद्युत पुरवठा करणेसाठी दि. ०७.०४.२०१६ रोजी ई निविदा प्रसिध्द केली होती व त्याअनुषंगाने चारही वाडयांच्या विद्युतीकरणाचे काम डिसेंबर, २०१६ अखेर पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान जवळील गावे कन्हाज विज सबस्टेशनला जोडण्याबाबत**

**(१४) ४५५४७ (२०-०४-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हयातील पारशिवनी तालुक्यातील कन्हान जवळील बारेडा, खेडी, निमखेडा गहू, हिवरा आदि गावे कन्हाज विज सबस्टेशनला जोडण्यात यावीत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ च्या चौथ्या आठवडयात केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३)असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गावे सबस्टेशनला जोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीकडून चौकशी करण्यात आली. खेडी, हे गांव चाचेर वाहिनीच्या शेवटच्या टोकावर असून वाहिनीची लांबी अंदाजे ४० कि.मी. आहे. या कारणामुळे खेडी गावाला कमी दाबाचा वीज पुरवठा होतो.
(३) नवीन ३३ के.व्ही. गोंडेगाव उपकेंद्र इन्फ्रा-१ योजनेअंतर्गत ´मार्च, २०१७ मध्ये कार्यान्वित करण्यात आले असून ह्या उपकेंद्रातून सदर गावांना विद्युत पुरवठा सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा धानोरा (ता.जि.चंद्रपूर) येथे ३३ के.व्ही. विद्युत सबस्टेशनची निर्मिती करणेबाबत**

**(१५) ४६४३५ (२०-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा धानोरा (ता.जि.चंद्रपूर) येथे ३३ के.व्ही. विद्युत सबस्टेशनची निर्मिती करणेबाबतचे पत्र मा.उर्जा मंत्री यांनी. व्यवस्थापकिय संचालक, महावितरण कंपनी मुंबई यांना दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने मौजा धानोरा येथे ३३ के.व्ही. विद्युत सबस्टेशनची निर्मिती करण्यात आली आहे काय,

(३)असल्यास, सदर विद्युत सबस्टेशनची निर्मिती करण्यास साधारणत: किती कालावधी लागणार आहे,

(४) तसेच मुख्य अभियंता चंद्रपूर परिमंडळ चंद्रपूर यांनी मा. मुख्य अभियंता म.रा.वि.वि. क. मर्या सांघिक कार्यालय प्रकाशगड बांद्रा यांना दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी दिलेल्या माहिती प्रमाणे मा. मुख्य अभियंता (भांडार) मुख्य कार्यालय मुंबई यांचे कडून भुमिगत विद्युत केबल परिक्षण वाहन चंद्रपूर शहरासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजा धानोरा येथे ३३ केव्ही उपकेंद्र पूर्व विदर्भातील ५ जिल्हयांमध्ये करावयाच्या योजनेमध्ये प्रस्तावित करण्यात आले असून उपकेंद्रासाठी जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) चंद्रपूर शहर महानगरपालिका अंतर्गत भूमिगत विद्युत केबल परिक्षणासाठी लघुदाब केबल परिक्षण यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील नचिकेत हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजध्ये आदिवासी विद्यार्थ्यांची राहण्याची व जेवण्याची व्यवस्था न झाल्याबाबत**

**(१६) ४६५४३ (२९-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील नचिकेत हायस्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजध्ये जव्हार प्रकल्पातील ६५ विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची योग्य प्रकारे राहण्याची तसेच जेवणाची व्यवस्था न झाल्यामुळे मोखाडा तालुक्यातील मोहंडा येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांनी माघारी आणले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण योग्यप्रकारे मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था न झाल्यामुळे घरी आणले हे खरे नाही.
(३) व (४) मोऱ्हांडा येथील परत आणलेल्या ६ विद्यार्थ्यांना विश्वात्मक जंगली महाराज अघई, ता.शहापूर, जि.ठाणे येथे सन २०१५-१६ मध्ये इयत्ता ५ वी त प्रवेश देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील एका सुतगिरणीच्या प्रकरणात ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशाचे पालन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी न केल्याबाबत**

**(१७) ४६८२९ (२०-०४-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील एका सुतगिरणीच्या प्रकरणात ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या आदेशाचे पालन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी न केल्याने दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात महावितरणच्या अधिकाऱ्यांना सर्वस्वी जबाबदार धरून राज्य वीज आयोगाने महावितरणच्या अधिकाऱ्यांना रु. ३ लाखांचा दंड केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांकडून दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बडनेरा व अमरावती मधील सातूर्णा, महाजनपुरा, हनुमाननगर, बडनेरा जुनीवस्ती परिसरातील उच्चदाबाची विद्युत वाहिनी हटविणेबाबत**

**(१८) ४९६८३ (२०-०४-२०१६). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बडनेरा व अमरावती मधील सातूर्णा, महाजनपुरा, हनुमाननगर, बडनेरा जुनिवस्ती परिसरातील लोकवस्ती मधील उच्चदाबाची विद्युत वाहिनी हटविणेबाबत व अमरावती-दस्तुरनगर-भानखेडा पर्यंत विद्युत पोल व स्ट्रिट लाईट लावणेबाबत आवश्यक निधी सन २०१६-१७ डि.पी.सी अंतर्गत मंजूर करणेबाबत मा.उर्जा मंत्री यांचे पत्र, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, अमरावती यांना दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी प्राप्त झाले असूनही अद्याप निधी मंजूर केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती दस्तुरनगर भानखेडा पर्यंत विद्युत पोल व स्ट्रिट लाईट लावणेबाबतचा आवश्यक निधी सन २०१५-१६ मध्ये डी.पी.सी. अंतर्गत मंजूर झालेला असून बडनेरा व अमरावती मधील सातूर्धा, महाजनपूरा, हनुमाननगर, बडनेरा जुनीवस्ती परिसरातील लोकवस्ती मधील उच्चदाबाची विद्युत वाहिणी हटविणेबाबतचा निधी अजूनपर्यंत मंजूर झालेला नाही.
(२) व (३) होय.

दस्तूर नगर अमरावती तो भानखेडा पर्यंत विद्युत पोल व स्ट्रिट लाईट लावणेकरीता महावितरण कंपनीस जिल्हा वार्षिक योजना २०१५-१६ अंतर्गत निधी प्राप्त झाला असून सदरची कामे पूर्ण झाली आहेत.

तसेच सातुर्णा, महाजनपुरा, हनुमाननगर, बडनेरा जुनीवस्ती परिसरातील लोकवस्ती मधील उच्चदाबाची विद्युत वाहिनीचे स्थलांतर करण्यासाठी रु. ५ कोटी निधीची आवश्यकता असून जिल्हा योजनेतून सदर निधीची मागणी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे महावितरणच्या अमरावती मंडळ कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे, परंतु सदर निधी अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर झालेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांचा आर्थिक विकास करण्याकरिता लघु उद्योग वा कुटिरउद्योग सुरु करण्याबाबत

**(१९) ५००६० (२७-०४-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांचा आर्थिक विकास करण्याकरिता लघु उद्योग वा कुटिरउद्योग सुरु करण्याकरिता शासनस्तरावरुन योजना आखण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे, त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) शासनामार्फत लघु उद्योग वा कुटीरउद्योग सुरु करण्याबाबत कोणतीही योजना राबविण्यात येत नाही. तसेच प्रस्तावितही नाही. राज्याच्या औद्योगिक धोरण २०१३ ला अनुसरुन राज्याच्या औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात महिला उद्योजकांच्या सक्रीय सहभागाने सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यासाठी महिला उद्योजकांकरिता विशेष प्रोत्साहन योजना शासन निर्णय दि.१४.१२.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. यामध्ये झोपडपट्टीतील महिलांसाठी स्वतंत्र योजना नसून, एकूण सर्वच क्षेत्रातील महिला उद्योजकांकरिता सदर विशेष प्रोत्साहन सुरु करण्यात आली आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी ही विकास आयुक्त (उद्योग) यांचे नियंत्रणाखालील उद्योग संचालनालयामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण निर्धारित वेळेत करण्यात महावितरण कंपनी अपयशी ठरल्याबाबत**

**(२०) ५०४३४ (२१-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण निर्धारित वेळेत करण्यात महावितरण कंपनी अपयशी ठरली असून ४२ शहर/गावांपैकी फक्त ७ गावांच्या शंभर टक्के तक्रारी वेळेत निकाली निघाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वाधिक महसूल देणारे परिमंडल म्हणून पुण्याकडे पाहिले जात असतांना वेळेत तक्रार निकाली काढण्याचे प्रमाण फक्त ५५ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) या संदर्भात महावितरणच्या संबंधित कार्यालयाच्या प्राप्त माहितीनुसार सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, संगणकीय प्रणालीमध्ये त्यांच्या पूर्ततेबाबत वेळेत नोंद घेतली गेली नसल्याने सदर तक्रारी प्रलंबित असल्याचे दिसून आले आहे.

(२) हे खरे नाही.

पुणे परिमंडळांतर्गत वीज पुरवठयाच्या तक्रारी निकाली काढण्याचे प्रमाण ९७.८५%, वीज बील दुरुस्ती तक्रारी निकाली काढण्याचे प्रमाण ५९% व इतर तक्रारी निकाली काढण्याचे प्रमाण ४२% आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत चौकशी करण्यात आली आहे.
(४) यासंदर्भात सर्व तक्रारींचे निराकरण महावितरण कंपनीकडून करण्यात आले असून संगणकीय प्रणालीमध्ये वेळेत नोंद घेतली नसल्यामुळे सदर तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर तक्रारींची पूर्तता करुन त्याची नोंद घेण्याबाबतच्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना महावितरण कंपनीने दिल्या आहेत. भविष्यात अशा तक्रारी वेळेत निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**किट्टी आडगांव (ता.माजलगांव, जि.बीड) येथे विजेच्या धक्क्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांस नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(२१) ५२७४२ (२०-०४-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किट्टी आडगांव (ता.माजलगांव, जि.बीड) येथील शेतकरी नारायण गमाजी काठुळे हे दिनांक ७ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास कापसाची वखरनी करत असतांना विद्‌युत कंपनीच्या निष्काळजीपणामुळे विद्‌युत प्रवाह चालु असलेला पोल बैलांच्या अंगावर पडल्याने दोन बैलांचा मृत्यू झाला व शेतकरी गंभीर जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तहसील कार्यालयाने या घटनेचा पंचनामा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढूळून आले व त्या अनुषंगाने शेतकऱ्यास नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय
(३) सदर अपघाताची चौकशी विद्‌युत निरीक्षक, विद्‌युत विभाग, बीड यांचे मार्फत दि. १३.१०.२०१५ रोजी करण्यात आलेली आहे.
(४) दि. ०७.१०.२०१५ रोजी श्री. नारायण गमाजी काठुळे यांनी शेतामध्ये कोळप्याच्या सहाय्याने ११ के.व्ही. उच्चदाब वाहिनीच्या पोलजवळ वखरणीचे काम करीत असताना सावधगिरी न बाळगल्याने अपघात घडला. सदर अपघातग्रस्तास नुकसान भरपाई देण्यासाठी कार्यकारी अभियंता, महावितरण कार्यालय, अंबाजोगाई यांना कळविण्यात आले होते. परंतु अपघात ग्रस्ताने महावितरणच्या स्थानिक कार्यालयास कागदपत्रांची पूर्तता अद्‌याप न केल्यामुळे, सदर नुकसान भरपाईचा प्रस्ताव प्रलंबित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडा व विदर्भातील उद्योगांना वीजदरात ३० टक्के सवलत देण्यात आल्याबाबत**

**(२२) ५३१०३ (२१-०४-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा व विदर्भातील उद्योगांना वीजदरात ३० टक्के सवलत देण्याचा शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील निर्णयाचा फेरविचार करण्याची औद्योगिक संघटनांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दि. २९.०६.२०१६ व दि. २४.०३.२०१७ च्या शासन निर्णयांद्वारे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, D व D+ क्षेत्रातील औद्योगिक ग्राहकांना इंधन समायोजन आकार सवलत व उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत व नवीन उद्योगांना प्रोत्साहनपर सवलत अशी वीजदरात सवलत देण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार सदर ग्राहकांना दिनांक १.०४.२०१६ पासून सदरची सवलत देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषीपंपाकरिता वीज जोडणी मिळण्याबाबत**

**(२३) ५४०७० (१६-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.किशोर पाटील (पाचोरा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गत वर्षी कृषीपंप विजजोडणीसाठी केलेल्या अर्जापैकी तब्बल २ लाख १० हजार ८४५ शेतकरी विजजोडणीपासून वंचित राहीले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणाच्या अधिकाऱ्यांकडून विलंब झाल्याने वीज जोडणी मिळण्याची शक्यता संपुष्टात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दुष्काळातही सिंचन सुविधा असतांनाही कृषीपंपाकरीता विजजोडणी मिळण्याबाबतच्या अडचणीमुळे शेतकऱ्यांसमोर पिक वाचविण्याच्या मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास महावितरण अधिकाऱ्यांचा दिरंगाईमुळे विजजोडणीस विलंब होत असल्याने अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१), (२), (३) व (४) राज्यात मार्च, २०१६ अखेर १७०४९१ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित होते. सदर कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्याकरिता सन २०१६-१७ मध्ये विदर्भ व मराठवाडयाकरिता विशेष पॅकेज योजना, पायाभूत आराखडा-२, जिल्हा वार्षिक योजना, इ. योजना राबविण्यात आल्या. सदर योजनांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १,२५,५२२ कृषीपंपांना वीजजोडण्या देण्यात आल्या असून मार्च, २०१७ अखेर २,०५,५९० कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

सन २०१७-१८ मध्ये एप्रिल, २०१७ ते ऑगस्ट, २०१७ अखेर ३४,४४५ कृषीपंपाचे ऊर्जीकरण विविध योजनांतर्गत करण्यात आले असून उर्वरित कृषीपंप वीज जोडणीची कामे प्रगतीपथावर आहेत.

सन, २०१६-१७ मध्ये कृषीपंप अनुशेष योजनेअंतर्गत राज्यातील ठाणे, रत्नागिरी, चंद्रपूर व गडचिरोली या अनुशेष जिल्ह्यातील १५०१४ कृषीपंपांचा अनुशेष दूर करण्याकरिता रु. १३८.७२ कोटी निधी मंजूर केला असून त्याअंतर्गत मार्च, २०१७ अखेर ६२४३ कृषीपंपाचा अनुशेष दूर करण्यात आला असून ठाणे व चंद्रपूर जिल्ह्यातील कृषीपंपाचा अनुशेष पूर्णपणे दूर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत**

**(२४) ५५७६७ (१६-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील भरमसाठ वीज बिल येणे, वीज बिल वेळेवर न येणे, मीटर जोडणीत अनेक अडचणी येणे, वीज जोडणी नसतानाही वीज बिल येणे अशा अनेक समस्यांना ग्राहकांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणाने शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यास विलंब केल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून वीज जोडणी नसतानाही शेतकऱ्यांना वीज देयके पाठविण्यात आल्याच्या घटना पनवेल तालुक्यात घडत असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सुरक्षा ठेव, प्रोसेसिंग फी, कनेक्शन फी भरून वर्ष होऊन सुद्धा महावितरणाने शेतकऱ्यांना वीज जोडण्या दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) वन विभागाने व शेजारच्या शेतकऱ्यांनी कृषीपंपाच्या वीज जोडणीचे काम चालू असताना प्रतिबंध केल्यामुळे पनवेल-२ उपविभागाअंतर्गत १ वर्षापूर्वी नवीन वीज जोडणीसाठी रक्कम अदा केलेल्या पाच कृषीपंपाच्या वीज जोडण्या प्रलंबित होत्या. त्यापैकी ४ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व एका कृषीपंपाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) यासंदर्भात महावितरण कंपनीकडून चौकशी करुन संबंधित शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून सामोपचाराने अडचणी दूर करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महावितरण अचलपूर विभागातील आसेगाव पूर्णा सर्कल मधील इन्फ्रा-२ योजनेंतर्गत विद्युत कामे पूर्ण न झाल्याबाबत**

**(२५) ६०८२३ (१६-०८-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण अचलपूर विभागातील आसेगाव पूर्णा सर्कल मधील इन्फ्रा-२ योजने अंतर्गत प्रस्तावित विद्युत विषयक कामे पूर्ण न झाल्यामुळे सदर कामे पूर्ण न केल्यास दिनांक ३०मार्च २०१६ रोजी अचलपूर विभागीय कार्यालय येथे आंदोलन करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी अचलपूर यांनी लेखी पत्राद्वारे प्रशासकीय यंत्रणांना तक्रारीद्वारे कळविले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण अचलपूर विभागातील आसेगाव पूर्णा सर्कल मधील इन्फ्रा योजने अंतर्गत प्रस्तावित विद्युत विषयक कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महावितरणमार्फत चौकशी करण्यात आली आहे.

(४) अचलपूर विभागाकरिता इन्फ्रा-२ च्या कामाचे कंत्राट निविदा प्रक्रियेद्वारे मे. कस्तुम इंजिनिअर्स, औरंगाबाद यांना दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी देण्यात आले असून कामे पूर्ण करण्याचा कालावधी २ वर्षे आहे. परंतु वेळोवेळी लेखी व तोंडी सूचना देऊन सुध्दा कामाची प्रगती मासिक उद्दीष्टापेक्षा कमी असल्याकारणाने दोन वेळा “नोटीस टू करेक्ट” तसेच “नोटीस टु टर्मिनेट” सदर कंपनीस देण्यात आले. परंतु सदर नोटीसा देऊन सुध्दा कामाच्या प्रगतीत

सुधारणा आढळून न आल्याने त्यांचे कंत्राट अंशत: रद्द करुन स्थानिक पातळीवर कंत्राटदाराने हाती न घेतलेल्या (Untouched) कामाच्या ११ निविदा काढण्यात आल्या असून सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विभागीय कार्यालया अंतर्गत प्रत्येक तालुक्याला एक फिल्टर युनिट (ट्रान्सफॉर्मर भवन) उभारण्याबाबत**

**(२६) ६१९०५ (१८-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय कार्यालया अंतर्गत प्रत्येक तालुक्याला एक फिल्टर युनिट (ट्रान्सफॉर्मर भवन) उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी मा.ऊर्जा मंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार अकोला मुर्तिजापूर तालुक्यात एक फिल्टर युनिट उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरणच्या अकोला मंडळांतर्गत प्रथम टप्प्यात बाळापूर व तेल्हारा येथे ट्रान्सफॉर्मर भवन उभारण्याबाबत निविदा काढण्यात आलेल्या होत्या. सद्यस्थितीत बाळापूर येथील काम पूर्ण झालेले असून तेल्हारा येथील निविदेस कंत्राटदारांचा कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.
तसेच बाळापूर व तेल्हारा येथे ट्रान्सफॉर्मर भवनातील यंत्रसामुग्री तथा नादुरुस्त झालेल्या रोहित्रांची दुरुस्तीबाबत २ निविदा काढण्यात आलेल्या होत्या. परंतु पुनर्निविदा काढून सुध्दा कंत्राटदारांचा कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने चुकीच्या इंधन अधिभारापोटी वसूल केलेल्या ७५ कोटीच्या रक्कमेचा परतावा यंत्रमागधारकांना देण्याबाबत**

**(२७) ६२०५८ (१८-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने चुकीच्या इंधन अधिभारापोटी वसूल केलेल्या ७५ कोटीच्या रक्कमेचा परतावा यंत्रमागधारकांना देण्याची घोषणा माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची घोषणा करुन आजपर्यंत इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथील यंत्रमागधारकांना परतावा देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरचा परतावा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१), (२) व (३) चुकीच्या इंधन अधिभारापोटी वसूल केलेल्या रक्कमेचा परतावा महावितरण कंपनीच्या परिपत्रक क्र. २२६, दि. ०५.०४.२०१६ नुसार माहे मार्च, २०१६ च्या बिलासोबत देण्यात यावा, असे निर्देश देण्यात आले होते. त्याअनुषंगाने कोल्हापूर परिमंडळाअंतर्गत इचलकरंजी, जि.कोल्हापूर येथील २४६८ यंत्रमागधारकांना रु. ७७.४५ लाख इतका परतावा महावितरण कंपनीच्या संगणक विभागातील नोंदीनुसार माहे एप्रिल, २०१६ च्या वीज देयकात देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत ७ ठिकाणी ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याबाबत**

**(२८) ६३४५२ (१८-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांत ७ ठिकाणी ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदरहू ठिकाणी ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील लोकप्रतिनिधींनी आष्टी तालुक्यात ४, पाटोदा तालुक्यात ३ व शिरुर तालुक्यात ३ अशी एकूण १० नवीन ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या उपकेंद्राची मागणी केलेली आहे.
(२) मागणी केलेल्या १० उपकेंद्रापैकी ३ उपकेंद्र १) मौजे रुई, ता. आष्टी, २) मौजे गोमळवाडा, ता.शिरुर का. व मौजे गहिनीनाथ गढ, ता. पाटोदा ही उपकेंद्रे सध्याच्या उपकेंद्रापासून ४ ते ५ किमी अंतरावर असल्यामुळे ते तांत्रिक दृष्ट्या सुसाध्य नाही. मौजे भायाळा ता. पाटोदा येथील उपकेंद्र कार्यान्वित असून मौजे पांगरा, ता. आष्टी हे उपकेंद्र दीनदयाल उपाध्याय ग्राम ज्योती योजनेअंतर्गत मंजूर आहे. ह्या योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील कामासाठी कार्यादेश देण्यात आला असून कामे प्रगतिपथावर आहेत. उर्वरित उपकेंद्र निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावित करण्यात येतील.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिंवडी शहर (जि.ठाणे) आणि परिसरातील यंत्रमाग धारकांना १ रुपया ५० पैसे युनिट वीज बिलाची आकारणी करण्याबाबत**

**(२९) ६३४८३ (१८-०८-२०१६). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहर (जि.ठाणे) आणि परिसरातील यंत्रमाग धारकांना १ रुपया ५० पैसे युनिट वीजबिलाची आकारणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने यंत्रमाग धारकांना सवलतीच्या दरात वीजबिल देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.विद्युत नियामक आयोगाने त्यांचे वीज दर आदेश दिनांक २६.०६.२०१५ व दि.०३.११.२०१६ लागू करतांना लघुदाब यंत्रमागधारकांकरिता नवीन वीज वर्गवारी निर्माण केलेली आहे. सदर वर्गवारीचे वीज दर औद्योगिक वर्गवारीच्या तुलनेत कमी ठेवण्यात आलेले आहेत. तसेच २७ एच.पी. पेक्षा कमी विद्युत जोडभार असलेल्या यंत्रमाग ग्राहकांना रु. २.७७/- प्रति युनिट व २७ एच.पी. पेक्षा जास्त जोडभार असलेल्या यंत्रमाग ग्राहकांना रु.४.२२/- प्रति युनिट वीजदर सवलतीसाठी शासनातर्फे महावितरण कंपनीस अनुदान देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील विद्युतवाहिन्या (विजेच्या तारा) तातडीने बदलण्याबाबत**

**(३०) ६४८४६ (१८-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील विद्युतवाहिन्या अत्यंत जिर्ण झाल्या असल्याने विद्युत तारा तुटून नागरिकांच्या व जनावरांच्या अंगावर पडल्यामुळे मृत्यमुखी व जखमी होण्याच्या घटना वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जिर्ण झालेल्या विद्युत तारा बदलण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) सन २०१६ मध्ये आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील जि.बीड येथील एकूण ६ व्यक्तींना व ४ जनावरांना विद्युत अपघात झाला आहे. तथापि सदरचे अपघात हे विद्युत तारा पडून झालेले नाहीत.

(२) जीर्ण तारा बदलण्याचे काम सुरु असून विद्युत अपघात झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना व जनावरांच्या मालकांना विद्युत निरिक्षक यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व संबंधित व्यक्तींनी सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर सदरील अपघात जर विद्युत संच मांडणीच्या दोषामुळे झाला असल्याचे विद्युत निरीक्षकांच्या अहवालामध्ये नमूद असल्यास संबंधितांना विद्युत वितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येते.

(३) बीड विभागांतर्गत आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यासह बीड व गेवराई तालुक्यांमधील जीर्ण झालेल्या विद्युत तारा बदलण्याकरिता रु.१९२.६१ लक्षची निविदा मे. तेजस इलेक्ट्रीकल्स ॲन्ड सप्लायर्स, बीड यांना जानेवारी, २०१६ मध्ये देण्यात आलेली आहे. सदरील निविदा अंतर्गत जीर्ण तारा बदलण्याबरोबरच ३३/११ के.व्ही. उपकेंद्रामधील दुरुस्ती तसेच रोहित्रांच्या वितरणपेटया बदलणे, वितरण रोहित्रांना रि-आर्थिंग करणे, सडलेले लोखंडी पोल बदलणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदरची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील पळचिल-चांभारगणी बुद्रुक राजिप शाळा व आड ग्रामपंचायत कार्यालय येथील विद्युत वाहक तारांवरील आवरण निघाल्याबाबत**

**(३१) ६६७४१ (२७-०१-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील पळचिल-चांभारगणी बुद्रुक राजिप शाळा व आड ग्रामपंचायत कार्यालय यांच्या मध्यभागी असणाऱ्या विद्युत ट्रान्सफार्मर जोडणा-या विद्युत वाहक तारांवरील वरील आवरण निघाले असल्याने याठिकाणी विजेचा धक्का लागून जीवितहानी होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणावरुन ये-जा करणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पावसाळयात विजेचा शॉक लागून शेतकऱ्यांसह अनेक जनावरे मृत्यूमूखी पडल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,

(५) असल्यास, चौकशीअंती पावसाळयात विजेचा शॉक लागून शेतक-यांसह अनेक जनावरे मृत्यूमूखी पडलेल्या नुकसानग्रस्त शेतक-यांना व त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) चांभारगणी बुद्रुक राजिप शाळा व आड ग्रामपंचायत कार्यालय यांच्या मध्यभागी असणाऱ्या ६३ के.व्ही.ए.क्षमतेच्या रोहित्राला जोडणाऱ्या विद्युत वाहक केबलवरील आवरण उष्णतेमुळे निघाले असल्याचे निदर्शनास आल्यानंतर तातडीने केबलची दुरुस्ती करण्यात आली. त्यामुळे तेथे कोणताही प्रकारचा अपघात घडलेला नाही व अपघाताचा धोका राहिलेला नाही. तसेच पळचिल व चांभारगणी बुद्रुक या ठिकाणावरुन ये-जा करणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांच्या जिवीतास धोका नाही व पावसाळयात विजेचा शॉक लागून शेतकऱ्यांसह जनावरे मृत्यूमुखी पडल्याच्या घटना घडल्याचे आढळून येत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू, तलासरी, पालघर, वसई (जि.पालघर) येथील वसतिगृहे व आश्रमशाळा यांच्या इमारतीची दुरस्ती करण्याबाबत

**(३२) ६६७९३ (१६-१२-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू, तलासरी, पालघर, वसई (जि.पालघर) येथे गेल्या १० वर्षात एकही नविन वसतिगृह उघडले न जाणे व अस्तित्वात असलेली वसतिगृहे व आश्रमशाळा यांच्या मोडकळीस आलेल्या इमारतीची दुरस्ती न केल्यामुळे दरवर्षी आदिवासी विद्यार्थ्यांची उत्तीर्ण संख्या वाढ झाल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी प्रवेश न मिळाल्यामुळे दरवर्षी हजारो गोर-गरीब विद्याथी अर्धवट शिक्षण सोडून आपल्या कुटुंबियांसह रोजगारासाठी बाहेरगावी स्थलांतर करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी मुलांना जवळच्या तालुक्यात प्रवेश मिळण्यासाठी वसतिगृहांची संख्या वाढविण्यासाठी विविध आदिवासी संघटनांनी मा. आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सन २०१० पासून मागणी करत आहे, परंतु याबाबत अजूनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण मिळण्याकरिता वसतिगृहांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) वसतीगृहांची संख्या वाढविण्याबाबत आदिवासी संघटनांची निवेदने शासनास प्राप्त होत आहेत.
(३) शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना सूरू करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धुळे जिल्हयासाठी ५०० विद्यार्थी क्षमतेचे वसतीगृह मंजूर करण्याबाबत

**(३३) ६७८९८ (२७-०१-२०१७). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयासाठी वाढीव क्षमतेचे ५०० विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह मंजूर करावे अशी मागणी आदिवासी एकता परिषदेने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या वर्षी १७५ विद्यार्थीनी व ३०० विद्यार्थी वसतीगृहाच्या सोयीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तात्काळ वसतीगृह निर्माण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना सूरू करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जाती-जमातीसाठीच्या विकास निधीबाबत

**(३४) ६९८९० (२७-०१-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती-जमातीसाठीच्या विकास निधीसाठी केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ मध्ये राज्य शासनास एकूण किती निधी प्राप्त झाला आहे,

(२) असल्यास, त्यापैकी प्रत्यक्षात किती निधीचा विनीयोग राज्य शासनाकडून करण्यात आला व तो कोणत्या जिल्ह्यात व त्याचे जिल्ह्यानिहाय प्रमाण काय आहे,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१३-०१-२०१८) :** (१) सन २०१४-१५ करीता केंद्र शासनाच्या योजनांतर्गत विभागास एकुण रु. ३१८.७८ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

(२) केंद्र शासनाकडून प्राप्त निधीपैकी रु. १०६.११ कोटी निधीचा विनियोग करण्यात आला असून उर्वरीत रु. २१२.६७ कोटी निधीच्या विनियोगाची कार्यवाही चालू आहे. तसेच सदर निधीचे वितरण जिल्हानिहाय न करता पूर्वनिर्धारित मागणीनुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय निहाय करण्यात येत असते.

(३) केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या निधीचा विनियोग आदिवासी विकास विभाग व राज्यातील इतर प्रशासकीय विभागाच्या माध्यमातून करण्यात येत असतो, त्यानुसार कार्यवाही सुरू आहे.

---

**नाशिक येथील सातपुर औद्योगिक वसाहतीमध्ये वारंवार खंडीत होणाऱ्या वीज पुरवठयाबाबत**

**(३५) ७०७९३ (०७-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सातपुर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये विजपुरवठा वारंवार खंडीत होत असून याबाबत आयमाच्या सभासदांनी मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी. नाशिक यांना माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदन देऊन वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रास होणारा वीज पुरवठा खंडीत होण्यामागील नेमकी कारणे काय आहेत,

(३) तसेच नाशिक येथील औद्योगिक क्षेत्रास अखंडीत वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) जुलै, ऑगस्ट, २०१६ मध्ये झालेल्या जोरदार पावसाने व वादळवाऱ्यामुळे वीज पडणे, यामुळे रोहित्र, उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी इ. नादुरुस्त झाल्यामुळे वीज पुरवठा खंडीत झाला होता.

(३) नाशिक येथील औद्योगिक क्षेत्रास अखंडीत वीज पुरवठा होण्याच्या दृष्टीने नवीन उपरी वाहिनी तसेच उपरी उच्चदाब व लघुदाब वाहिन्या भूमिगत करणे अंतर्गत नाशिक शहर-१ विभागात पायाभूत आराखडा-२ योजना ( INFRA-II ) मध्ये २२००/- लक्षची कामे मंजूर असून त्यात सातपुर औद्योगिक क्षेत्राचा समावेश असून सातपुर औद्योगिक क्षेत्रात रु. ३९.४१/- लक्षची कामे करण्यात आलेली आहेत.

तसेच उपकेंद्राची वितरण क्षमता वाढविणे, पावसाळयापूर्वी वाहिनींची व उपकेंद्रांची देखभाल व दुरुस्तीची कामे करणे, वितरण प्रणाली लगत असलेल्या वृक्षांच्या फांद्यांची छाटणी करणे इ. कामे करण्यात आली आहेत.

---

**मोरडे व झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील रस्त्यांवर विद्युतखांब व पथदिव्यांची व्यवस्था करण्याबाबत**

**(३६) ७१३१८ (२७-०१-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत मोरडे, मु.पो. झोरेवाडी (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील झोरेवाडी व मिरगरवाडी या गावातील रस्त्यांवर विद्युतखांब व पथदिव्यांची व्यवस्था करण्याबाबत ग्रामपंचायतीने व लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१६ तसेच मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१६ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे व संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर गावातील रस्त्यावरील विद्युत पोलवर पथदिव्यांच्या व्यवस्थेकरीता स्थानिक कंत्राटदारास दि. १६.०९.२०१७ रोजी महावितरणकडून कार्यादेश देण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या विज महामंडळाच्या महापारेषण कंपनीतील अभियंता आणि तांत्रिकी कामगारांची १५०० पदे कमी करण्याचा निर्णय महापारेषण कंपनीने घेतल्याबाबत**

**(३७) ८१०८५ (२८-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या वीज महामंडळाच्या महापारेषण कंपनीतील अभियंता आणि तांत्रिकी कामगारांची १५०० पदे कमी करण्याचा निर्णय महापारेषण कंपनीने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर पदांवरील अभियंता आणि तांत्रिक कामगारांना दुसरीकडे सामावून सामावून घेण्याबाबत कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०१-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या त्रिभाजनानंतर महापारेषण कंपनी अस्तित्वात आली. त्रिभाजनाच्या वेळेस कंपनीतील वेतनगट ३ व ४ मधील पदे भरण्यास महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने बंदी घातली होती. सदर बंदीच्या अनुषंगाने आकृतीबंध मंजूर करुन सन २००८ मध्ये तो लागू करण्यात आला. दरम्यानच्या काळात महापारेषण कंपनीच्या पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र वाढ झाली आहे. तसेच, अभियांत्रिकी क्षेत्रात झालेल्या प्रगतीस अनुसरुन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आलेला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून महापारेषण कंपनीने पारेषण(Transmission), तंत्रज्ञ (Technician) व यंत्रचलन (Operating) या संवर्गातील सुच्यग्रस्तंभ (Pyramid) यामध्ये योग्यरित्या बदल करुन कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीमध्ये एकसुत्रता आणणे आणि त्यांना विकासाची संधी उपलब्ध करुन देणे व कंपनीच्या भवितव्यासाठी मनुष्यबळाचा योग्य तऱ्हेने उपयोग करण्याच्या हेतुने तांत्रिक (Technical) व यंत्रचलन (operating) या संवर्गाचे एकत्रीकरण करून सन २००८ मध्ये लागू केलेला आकृतीबंधसुधारित करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चांदूस व दावडी (ता.खेड, जि.पुणे) येथील धामणटेक फाट्याजवळ विजेच्या तारांमुळे लागलेल्या आगीत शेतकऱ्यांचे झालेले नुकसान**

**(३८) ८४२४८ (२८-०४-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूस (ता.खेड, जि.पुणे) येथे विद्युत वाहिनीच्या तारा एकमेकांना चिकटल्याने शॉर्ट सर्किट होऊन दिनांक ०९ नोव्हेंबर, २०१६ रोजी लागलेल्या आगीत शेतकऱ्यांच्या शेतातील उस जळून नष्ट झाला तसेच दावडी (ता.खेड, जि.पुणे) रस्त्यालगत धामणटेक फाट्याजवळ वीज वाहक तारांचे घर्षण होऊन दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आग लागून नर्सरीमधील १५ टन उसाचे बियाणे व रोपे जळून नष्ट झाल्याची लेखी तक्रार शेतकऱ्यांनी महावितरणच्या अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने पाहणी केली आहे काय,

(३) त्यानुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना महावितरणने किती आर्थिक सहाय्य केले वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१), (२) व (३) चांदूस (ता.खेड जि.पुणे) येथे विद्युत वाहिनीच्या तारा एकमेकांना चिकटल्याने शॉर्ट सर्किट होऊन दि. ०९/११/१६ रोजी लागलेल्या आगीत शेतकऱ्यांच्या शेतातील उस जळून नष्ट झाला तसेच दावडी (ता.खेड, जि.पुणे) रस्त्यालगत धामणटेक फाटयाजवळ वीज वाहक तारांचे घर्षण होऊन दि. ५/१२/१६ रोजी वा त्यासुमारास आग लागून नर्सरीमधील १५ टन उसाचे बियाणे व रोपे जळून नष्ट झाल्याची कोणतीही लेखी तक्रार महावितरणच्या राजगुरुनगर येथील विभागीय कार्यालयात प्राप्त झालेली नाही. तसेच विद्युत निरीक्षक कार्यालय, पुणे येथेही सदर तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे आलापल्ली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील श्री. स्वामी समर्थ अनुदानित आदिवासी आश्रमशाळेतील गैरप्रकाराबाबत

**(३९) ८४४४३ (२८-०४-२०१७). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. आलापल्ली (ता.अहेरी, जि.गडचिरोली) येथील श्री स्वामी समर्थ अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, उडेरा मधील श्री.वली खान, मदतनीस या कर्मचाऱ्याचे मागील २ वर्षापासूनचे प्रलंबित असलेले वेतनांचे देयक मुख्याध्यापकांनी तयार केलेले नसतानाही कर्मचाऱ्यांनी श्री.बाबुसाहेब पंचभाई, प्रकल्प कार्यालय, भामरागड यांचेशी आर्थिक संगनमत करुन मुख्याध्यापकांचा बनावट शिक्का तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्याची मागणी सचिव, पितृछाया बहुउद्देशिय शिक्षण संस्था, भंडारा यांनी माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान मा.आदिवासी विकास मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मुख्याध्यापकांची बनावट स्वाक्षरी करुन देयके सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या प्रकरणी प्रकल्प कार्यालय, भामरागड या कार्यालयाच्या चौकशी समितीने चौकशी केली असून वेतन देयकावरील मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीत तफावत दिसून येत असली तरी देयकाच्या कवरिंग लेटरवरील स्वाक्षरीत प्रथमदर्शनी तफावत दिसून येत नाही.

उपलब्ध दस्तऐवज व घटनाक्रमावरुन या प्रकरणात प्रकल्प कार्यालयातील कर्मचा-यांचा सहभाग दिसून आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) दारिद्रय रेषेखालील व मासिक उत्पन्न ६०० रुपये असलेल्या महिलांना शासकीय सोयी देण्याबाबत**

**(४०) ८६०७४ (०९-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कणकवली तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) दारिद्रय रेषेखालील व मासिक उत्पन्न ६०० रुपये असलेल्या महिलांना शासकीय सोयी देण्याची अनेक प्रकरणे जिल्हास्तरावर व शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रकरणांमध्ये कणकवली तालुक्यातील असलदे, तावडेवाडी या गावातील श्रीमती कुंदा रामचंद्र देवरुखकर या निराधार व अपंग महिलेला शासकीय सोयी मिळाव्यात यासाठी तिने जिल्हास्तरावर २५ वर्षे प्रयत्न करुनही तिच्या अर्जाला मंजूरी दिली असून त्यांच्या अर्जाला मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, गेली २५ वर्षे जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात विना मंजूरी प्रलंबित ठेवण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१०-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

श्रीमती कुंदा रामचंद्र देवरुखकर रा. असलदे यांना संजय गांधी योजनेखाली माहे जुलै, १९८१ पासून लाभ मंजूर करण्यात आला असून ऑगस्ट, २०१७ पर्यंत लाभ देण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे गांडुळवाढ (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील आश्रमशाळेत अनुदानात होत असलेला गैरव्यवहार**

**(४१) ८७७२४ (०९-०८-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गांडुळवाढ (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील शाळेस अनुदान मिळूनही विद्यार्थ्यांना व्यवस्थित जेवण न मिळणे, शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांना वेळेवर न मिळणे इ. गैरसोयी असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुस-या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर शाळेत सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुख्याध्यापक, अनुदानित आश्रमशाळा, गांडुळवाढ, ता.शहापूर, जि.ठाणे यांनी सादर केलेल्या खुलाश्यानुसार व सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर यांच्या चौकशी अहवालानुसार विद्यार्थ्यांना शासनाच्या निकषाप्रमाणे नाष्टा व जेवण व आवश्यक सुविधा दिल्या जात असून शैक्षणिक साहित्य पुरवठा ही वेळेत करण्यात येतो. तसेच आश्रमशाळेस प्राप्त अनुदानात कुठलाही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई दिघा-पाडा येथील प्लॉट २१ येथील कंपनीने तेथील रहदारीचा रस्ता उपलब्ध करून देणेबाबत**

**(४२) ८७९०० (१८-०८-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई मधील दिघा पाडा येथील प्लॉट न. २१ हा एम .आय.डी.सी ने पिरॅमिड इन्ट्रामॅक प्रा.ली. यांना विकला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने तेथील २५० घरांची लोकवस्ती असलेल्या नागरिकाच्या रहदारीचा मार्ग बंद केला आहे, हे ही खरे काय,
(३) तसेच रहदारीचा मार्ग बंद केल्याने नागरिकांना शौचालय व इतर सुविधांचा वापर करण्यास अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त नागरी वस्तीला रहदारीचा रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
महामंडळाने दिनांक ०८/०७/२०१५ रोजी उक्त कंपनीस भूखंड क्रमांक एक्स-२१ चे वाटप केले असून दि. ०४/०८/२०१६ रोजी ताबा दिलेला आहे.
(२) हे खरे नाही.

महामंडळाने भूखंड क्र. एक्स २१ हा पुर्वीच आरेखित केलेला आहे. परंतु भूखंड क्रमांक २१ च्या तीन्ही बाजुस अतिक्रमण असल्याने नवी मुंबई महानगरपालिकेने जाणे-येणे साठी भूखंड क्रमांक २१ च्या उत्तरेस व पुर्वेस एक पदपथ उपलब्ध करुन दिलेला आहे. या पदापथावरुन दोन्ही बाजुने मुख्य रस्त्यास जाता येते. त्यामुळे लोकवस्तीस रहदारीचा मार्ग उपलब्ध आहे.

(३) हे खरे नाही.

झोपडपट्टी वासियांना शौचालय व इतर सुविधा वापरासाठी नवी मुंबई महापालिकेने पदपथ पुरविला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथील दोन अनुदानित आश्रम शाळा बंद असून कर्मचाऱ्यांना दोन वर्ष वेतन मिळाले नसल्याबाबत

**(४३) ८८३२६ (०९-०८-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोंदिया जिल्ह्यातील देवरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत चालविऱ्या जाणाऱ्या (सडक अर्जुनी व दोद्गे जांभळी) येथील दोन अनुदानित आश्रमशाळा शासनाने दोन वर्षांपूर्वी बंद केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथे काम करणाऱ्या १२ चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे समायोजन अद्याप झालेले नाही, तसेच शाळा बंद झाल्यामुळे दोन वर्षांपासून त्यांना वेतन ही मिळालेले नाही असे दिनांक २९ मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०३-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) बंद आश्रमशाळांतील १२ चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे इतर अनुदानित आश्रमशाळांमध्ये समायोजनाचे आदेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ५ कर्मचा-यांना रुजू करुन घेण्यात आले आहे. उर्वरित कर्मचा-यांना संस्थेने हजर करुन घेतले नाही.

कर्मचा-यांना रुजू करुन घेण्यास नकार देण्या-या संस्थेचे अनुदान रोखण्यात आले आहे. ज्या शिक्षक शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे नागपूर विभागात रिक्त नाही, अशा कर्मचा-यांचे समायोजन आयुक्तालय स्तरावरुन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड तालुक्याच्या (जि.पुणे) आदिवासी भागातील टोकावडे येथील आश्रमशाळेत संरक्षक भिंतीचे काम सुरु केल्याबाबत

**(४४) ८८३६६ (०९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्याच्या (जि.पुणे) आदिवासी भागातील टोकावडे येथील आश्रमशाळेत आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आश्रमशाळेची नवीन इमारत व शिक्षकांच्या निवासस्थानाची इमारत बांधण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आश्रमशाळेची इमारत व शिक्षक निवासस्थानाच्या इमारतीचे काम सद्य स्थितीत बंद असून ते पूर्ण न करता इमारतीसाठी संरक्षक भिंतीचे काम हाती घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आश्रमशाळा इमारत व शिक्षक निवासस्थान यांचे बांधकाम अपूर्ण ठेवून संरक्षक भिंतीचे काम करण्याची कारणे काय आहेत व या सर्व कामासाठी आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे व अजून किती निधीची आवश्यकता आहे व त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१८) :** (१) खेड तालुक्यातील (जि.पुणे) आदिवासी विभागातील टोकावडे येथील आश्रमशाळेत आदिवासी विकास प्रक्ल्पांतर्गत आश्रमशाळेची नवीन इमारत बांधकाम सुरु आहे. परंतु शिक्षकांच्या निवासस्थानाच्या इमारत बांधण्याचे काम सुरु झालेले नाही.
(२) व (३) आश्रमशाळा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संरक्षक भिंतीचे काम सुरु केले आहे. सदर कामास जिल्हा नियोजन समितीने रु.४९.५० लक्ष रक्कम मंजूर केली असून रु.३१.१० लक्ष खर्च झाला आहे.

आश्रमशाळा इमारत रू.४,९९,०३,०००/- व मुला-मुलींचे वसतीगृह इमारत बांधकामास रु.४,९५,०९,९५४/- इतक्या रक्कमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सद्य:स्थितीत इमारत बांधकाम व संरक्षक भिंत काम सुरु आहे.

---

**चाकण ते राजगुरुनगर दरम्यान एक्स्प्रेस लाईनचे काम बंद असल्याबाबत**

**(४५) ८८३७० (०९-०८-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजगुरुनगर (ता.खेड, जि.पुणे) या शहराची व परिसरातील नागरिकांची विजेची वाढती मागणी पाहता मागणीच्या अनुषंगाने पुरेसा वीज पुरवठा होण्यासाठी चाकण ते राजगुरुनगर दरम्यान एक्स्प्रेस लाईनचे काम वीज वितरण महामंडळाच्या पायाभूत आराखडा सक्षमीकरण विभागांतर्गत सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाकण ते राजगुरुनगर या दरम्यान टाकण्यात येणाऱ्या वीज वाहिनीचे काम माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान बंद असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,एक्स्प्रेस लाईनचे काम बंद ठेवण्याची कारणे काय आहेत व हे काम पूर्ण होण्यास अजून किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर ३३ के.व्ही. डबल सर्कीट इनकमींग वीज वाहिनी उभारणीचे काम पूर्ण झाले असून उपरोक्त वीज वाहिनी लगत झाडाच्या मोठया फांद्या वाहिनीवर व वाहिनीजवळ आल्या असल्याने त्या तोडण्यासाठी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे परवानगीसाठी अर्ज प्रलंबित आहे. तसेच उपरोक्त वाहिनीसाठी नजिकच्या अतिउच्चदाब उपकेंद्रातून ३३ केव्ही प्रस्तावित बे उपलब्ध झालेला नाही. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर, विद्युत संच मांडणी तपासणी व सदर वाहिनी विद्युत भारीत करण्याची परवानगी घेऊन ती विद्युत वाहिनी कार्यान्वित करण्यात येईल.

---

**नाशिक एमआयडीसीतील अविकसीत भूखंड ताब्यात घेणेबाबत**

**(४६) ८८९५० (१८-०८-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक सातपूर, अंबड एमआयडीसीतील उद्योजकांनी विकसित न केलेले भूखंड पुन्हा ताब्यात घेण्याची प्रक्रिया नाशिक एमआयडीसीकडून माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमआयडीसीला किती भूखंड ताब्यात मिळाले असून उर्वरीत भूखंड धारकांना नोटिसा बजावल्या आहेत काय,

(३) असल्यास, अशा भूखंड धारकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (११-०१-२०१८) :** (१) भूखंडधारकाने विहीत कालावधीत भूखंड विकसीत न केल्यास भूखंड ताब्यात घेण्याची कारवाई करण्यात येते. ही सतत चालणारी प्रक्रिया आहे.

(२) व (३) सातपूर औद्योगिक क्षेत्रामध्ये ३६ उद्योग घटकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही. त्यापैकी ३५ उद्योग घटकांनी भूखंडावर इमारत बांधकाम केलेले असून घटक उत्पादनात आहेत. १ भूखंड पूर्णत: रिक्त आहे.

जे भूखंडधारक इमारत पूर्णत्वाचा दाखला न घेता उत्पादनात आहेत त्यांना महामंडळामार्फत नोटीसा देण्यात आल्या असून कारवाई करण्यात येत आहे.

तसेच अंबड औद्योगिक क्षेत्रात १९ उद्योग घटकांनी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त केलेला नाही. त्यापैकी १८ भूखंडधारकांनी भूखंडावर बांधकाम केले असून घटक उत्पादनात आहेत.

जे १८ भूखंडधारक इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त न करता उत्पादनात आहेत त्यापैकी ९ भूखंडधारकांना महामंडळाने नोटीसा दिलेल्या आहेत.उर्वरित ९ भूखंड हे शासकीय आस्थापनांना वाटप केले असून त्यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून महामंडळाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील काही सोसायटयांनी पीक कर्ज वसूल करुन घेताना व्याजासह वसूल करुन घेतलेबाबत**

**(४७) ९०१७३ (१८-०८-२०१७). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पीक कर्जातून शेतकऱ्यांना व्याजाचा भुर्दंड बसू नये याकरिता १५ वर्षापूर्वी शासनाने डॉ.पंजाबराव देशमुख पीक कर्ज व्याज सवलत योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत शेतकऱ्याला दरवर्षी व्याजाची रक्कम द्यावयाची असा शासन निर्णय आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील काही सोसायटयांनी पीक कर्ज वसूल करुन घेत असताना ते व्याजासह वसूल करुन घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच ही योजना यशस्वीपणे राबविण्याकरिता शासन कोणती कार्यवाही करणार आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०६-०१-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय. या योजनेअंतर्गत व्याज परतावा त्या-त्या आर्थिक वर्षात प्राप्त न झाल्याने तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील काही सोसायट्यांनी व्याजासह रक्कम वसूल केली आहे. व्याज परताव्याची रक्कम संबंधित सोसायटीस प्राप्त होताच सभासदांच्या नावावर वर्ग करण्यात येते.

(४) व (५) याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचे, शासन निर्णयाप्रमाणे पात्र लाभार्थीना लाभ मिळण्यासाठी कार्यवाही होत असल्याचे तसेच संबंधितांना अनुदान प्राप्त होताच त्या-त्या वेळी वितरित केले जाते, असे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांनी कळविले आहे.

---

**औरंगाबाद महानगर पालिका हद्दीतील पडेगाव येथील महापारेषणच्या टॉवर्सजवळ अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(४८) ९०४६९ (०९-०८-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगर पालिका हद्दीतील पडेगाव येथील महापारेषण कंपनीने वीजवहनासाठी उभारलेल्या उच्चदाबाच्या टॉवर्सजवळ अनधिकृत बांधकाम केले आहे तसेच या ठिकाणी अनधिकृत प्लॉटिंग करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यानुसार संबधितांची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर वाहिन्यांखाली अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यानंतर नागरिकांच्या जिवितास धोका पोहोचू नये म्हणून बांधकाम केलेल्या संबंधित नागरिकांस भारतीय विद्युत नियम, १९५६ च्या कलम ८२ अन्वये महापारेषण कंपनीकडून लेखी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच याबाबत महापारेषण कंपनीकडून मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद व आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना दिनांक २६.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये उचित कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने कळविल्यानुसार, सदर ठिकाणी झालेल्या अतिक्रमणाची चौकशी करुन तेथील मिळकत धारकांच्या मालकी हक्कांची पडताळणी करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९६६ मधील कलम २६० व ४७८ अन्वये सूचना पत्र देवून अतिक्रमण काढण्याची कार्यवाही औरंगाबाद महानगरपालिकेकडून करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे हातभट्टीच्या दारूसाठी वापरण्यात येणाऱ्या काळ्या गुळाचा ट्रक पकडण्यात आल्याबाबत

**(४९) ९१६१५ (०४-०९-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) येथे हातभट्टीच्या दारूसाठी वापरण्यात येणाऱ्या काळ्या गुळाचा ६०० ढेपींसह ट्रक दिनांक १८ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास पकडण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, असे प्रकार या परीसरात वारंवार निदर्शनास येत असूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने दोषीं आढळणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०१-२०१८) :**(१), (२), (३) व (४) होय. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकास दि.१८.०६.२०१७ रोजीच्या मध्यरात्री गस्तीमध्ये चिपळूण तालुक्यातील मौजे उमरोली येथे पकडलेल्या ट्रकमध्ये रु.२०.८० लक्ष किंमतीच्या काळया गुळाच्या ६०० ढेपी आढळून मिळून आल्या आहेत. काळया गुळाच्या ६०० ढेपीसह वाहनचालकास ताब्यात घेवून रु.२०,८०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ अंतर्गत गुन्हा नोंदवून १ पुरुष व १ महिला आरोपीस अटक करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्हयात अवैध दारु निर्मिती/विक्री/ वाहतूक करणाऱ्याविरुध्द राज्य उत्पादन शुल्क आणि पोलीस विभागामार्फत नियमितपणे कारवाई करण्ण्यात येते. त्याअंतर्गत राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०१६-१७ या वर्षात ६ गुन्हे नोंदवून ३ वाहनांसह २३,३२० कि.ग्रॅ. काळा गूळ जप्त करण्यात आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये काळा गुळ अवैधरित्या बाळगल्याप्रकरणी २ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला येथील महावितरण कंपनीत बनावट आणि बोगस अनुभव प्रमाणपत्राच्या आधारे जनसंपर्क अधिकाऱ्याने नोकरी मिळवल्याबाबत**

**(५०) ९१८७० (०९-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील महावितरण कंपनीत बनावट आणि बोगस अनुभव प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी मिळवणा-या एका जनसंपर्क अधिकाऱ्याबाबतची तक्रार माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार या अधिका-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०१-०१-२०१८) :** (१) याबाबतचा तक्रार अर्ज महावितरण कंपनीस प्राप्त झाला आहे.

(२) महावितरण कंपनीने त्यांच्या जाहिरात क्र. १/२००५ अन्वये "माहिती व जनसंपर्क अधिकारी" या पदासाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. सदर जाहिरातीनुसार निवड झालेल्या संबंधित जनसंपर्क अधिकारी यांनी नियुक्तीपूर्वी विहित अर्हता प्राप्त केली होती. तसेच लेखी परीक्षा व मुलाखती यामध्ये गुणवत्तेनुसार खुल्याप्रवर्गातून त्यांची निवड झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.